**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस

- निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातली अर्जांची छाननी पूर्ण महाराष्ट्रातल्या ११ मतदारसंघात मिळून ३०१ अर्ज वैध

- अन्नपदार्थात शिल्लक राहणाऱ्या कीटकनाशकांच्या अवशेषांसंबंधी भारतात अतिशय कठोर कायदे असल्याचं केंद्र सरकारचा खुलासा

- जम्मू काश्मीरमध्ये भारतीय वायुसेनेच्या ताफ्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्या प्रकरणी ६ गावकरी चौकशीसाठी ताब्यात

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्स यांची लढत धरमशाला इथं, तर लखनऊ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्स चा सामना लखनौत रंगणार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराला आजचा एकच दिवस शिल्लक असल्यामुळे राजकीय पक्षांकडून मतदारांपर्यंत पोचण्याची पराकाष्ठा केली जात आहे. प्रचारसभा आणि पथफेऱ्यांवर राजकीय पक्षांकडून भर दिला जात आहे. या टप्प्यात दहा राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशासह ९४ मतदारसंघांमध्ये ७ मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात गुजरातच्या सर्व २६

जागांसाठी मतदान होत आहे. या बरोबरच कर्नाटकच्या १४ आणि आसामच्या ४, उत्तर प्रदेशातल्या १०, मध्यप्रदेशात ८, बिहारमधे ५, पश्चिम बंगालमधे ४, छत्तीसगड ७ आणि गोव्यात २ ठिकाणी मतदान होणार आहे. जम्मू, दादरा नगरहवेली, दमण दीव या केंद्रशासित प्रदेशातल्या प्रत्येकी एका मतदारसंघातही येत्या ७ मे रोजी मतदान होईल. या टप्प्यात महाराष्ट्रातल्या रायगड, रत्नागिरी - सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले, सांगली, सोलापूर, बारामती, उस्मानाबाद, लातूर, माढा, आणि सातारा, या ११ मतदारसंघात ७ मे ला मतदान होणार आहे.

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या ५ व्या टप्प्यात ल्या उमेदवारी अर्जांची छाननी काल करण्यात आली. १३ लोकसभा जागांसाठी मतदान होत असून काल या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत ३९७ उमेदवारांचे एकूण ५१२ अर्ज आले होते. त्यापैकी ३०१ अर्ज वैध ठरल्याची माहिती राज्य निवडणूक कार्यालयानं दिली आहे. या टप्प्यात मतदान येत्या २० मे रोजी होणार आहे.

**<><><><>**

निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यातल्या प्रचारालाही जोर आला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तरप्रदेशात प्रचार दौरा करीत असून ते अयोध्येत रोड शो करणार आहेत, तसंच ते रामलला मंदिरात जाऊन दर्शन घेतील आणि पूजा करतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज आंध्रप्रदेशात धर्मावरम इथं प्रचारसभा घेतली.

**<><><><>**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात २९८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असतील. या टप्प्यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या

मतदारसंघांमध्ये निवडणूक होणार आहे. या मतदारसंघांमध्ये एकंदर दोन कोटी २८ लाख मतदार त्यांचा कौल देणार आहेत. तिथं येत्या तेरा तारखेला मतदान होणार असून, चार जूनला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणूक कालावधीत निवडणुकीचे अंदाज, अर्थात ओपिनियन, तसंच एक्झिट पोल दर्शविण्यास भारत निवडणूक आयोगानं मनाई केलेली आहे. महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होत असून, गेल्या १६ मार्च रोजी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्यात गेल्या १९ एप्रिल रोजी सकाळी सात वाजेपासून येत्या एक जून २०२४ रोजी सायंकाळी साडे सहा वाजेपर्यंतच्या काळात हा प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी ४८ तासांच्या कालावधीत असे अंदाज अथवा मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर बंदी असेल, असं आयोगाच्या अधिसूचनेत स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण पुणे आणि शिरुर लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

अन्नपदार्थात शिल्लक राहणाऱ्या कीटकनाशकांच्या अवशेषांसंबंधी भारतात अतिशय कठोर कायदे असल्याचं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे. फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स अथॉरिटी ऑफ इंडिया - एफ एस एस ए आय म्हणजेच अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने काही वनस्पती आणि मसाल्यांमधे कीटकनाशकांच्या

अवशेषांचं प्रमाण अधिक राहण्याला परवानगी दिली असल्याचं वृत्त समाजमाध्यमांवर फिरत असून त्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने हा खुलासा केला आहे. केंद्रीय कृषी मंत्रालय केंद्रीय कीटकनाशक बोर्डामार्फत कीटकनाशकांच्या दर्जाबाबत नियंत्रण करतं, आणि तज्ञ वैज्ञानिकांच्या शिफारशींनुसारच उत्पादनांना परवानगी दिली जाते असं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये भारतीय वायुसेनेच्या ताफ्यावर काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात सुरक्षा दलांनी ६ गावकऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. या हल्ल्यात वायुसेनेचा १ जवान शहिद झाला तर ५ जवान जखमी झाले होते. हल्लेखोरांना मदत केल्याचा या गावकऱ्यांवर संशय असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहराने कळवलं आहे. वायुसेनेच्या वाहनांचा ताफा पूंछ जिल्ह्यातल्या शासिधार जंगल भागातून सनाई टॉप कडे जात असताना काल झालेल्या या हल्ल्यात अतिरेक्यांनी सुमारे ३० गोळ्या झाडल्या होत्या. या संदर्भात राष्ट्रीय रायफल्सचे जवान आसपासच्या गावांमधून झडती घेत आहेत.

या हल्ल्यात शहीद झालेले कॉर्पोरल विकी पहाडे यांना भारतीय वायुसेनेने श्रद्धांजली वाहिली आहे. 'देशाच्या सेवेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या या वीराला शतशः नमन' या शब्दांत एअर चीफ मार्शल व्ही आर चौधरी आणि सेनेच्या सर्व अधिकारी तसंच जवानांनी समाज माध्यमांवर श्रद्धांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

ईशान्य भारतात आज आणि उद्या वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील पाच दिवसांत अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सिक्कीम, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या ते

मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तर वायव्य आणि मध्य भारतातील अनेक भागांमध्ये कमाल तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. देशाच्या उर्वरित भागात कमाल तापमानात कोणताही लक्षणीय बदल होण्याची शक्यता नसल्याचं आयएमडीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यात काल दहशतवाद्यांच्या गटानं वायुदलाच्या ताफ्यावर केलेल्या हल्यात वायुदलाच्या एका एअरमनाला वीरगती प्राप्त झाली. या हल्ल्यात पाच सैनिक जखमी झाले, असून त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. हा हल्ला शाह सत्तार वनक्षेत्रात झाला. सशस्त्र दलांवर झालेल्या हल्ल्यापैकी या वर्षातला हा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला आहे. हल्ल्यानंतर जखमी सैनिकांना पुंछ मधून उधमपूर मधल्या कमांड रुग्णालयात नेण्यात आलं.

**<><><><><>**

दक्षिण ब्राझील मधील वादळ आणि अतिवृष्टीमध्ये मरण पावल्याची संख्या आता ६० वर पोचली असून ६७ जण बेपत्ता असल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं आहे. गेल्या ८० वर्षातल्या या सर्वात जास्त विनाशकारी पुरामध्ये अजूनही हजारो लोक अडकले असून २३ हजार नागरिकांना विस्थापित व्हावं लागलं आहे. बेंतो गोंकालवेस आणि कॉटिपोरा या दोन शहरांच्या मध्ये असलेलं धरण गुरुवारी फुटल्यामुळे पाण्याचा लोंढा शिरून एक जलविद्युत केंद्र उध्वस्त झालं आणि ताकारी नदीच्या खोऱ्यातली अनेक गावं जलमय झाली होती. पोर्तो ऑलेग्री या नदीला पूर आल्यामुळे राजधानीपासून ८० किलोमीटर अंतरावरच्या फेलिक्स शहराला जोडणारा पूल वाहून गेला आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना हा चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्स यांच्यात धरमशाला इथं हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर दुपारी साडेतीन वाजता सुरु होईल. तर दुसरा सामना हा लखनऊ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात लखनौ मधल्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

दरम्यान काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं गुजरात टायटन्सवर ४ गडी राखून विजय मिळवला.

इंडियन प्रीमियर लीग- आयपीएल क्रिकेट स्पर्धेची चुरस आता शिगेला पोहोचली आहे. एकंदर आजवरची स्थिती आणि प्राप्त आकडेवारीनुसार स्पर्धेत सहभागी सर्वच संघांनी दहा सामने खेळले आहेत. यात राजस्थान रॉयल्स संघ आठ विजयांसह सोळा गुण मिळवबन अव्वल स्थानावर आहे, तर मुंबई इंडियन्स संघ आठ पराभव आणि सहा गुण घेत शेवटच्या स्थानावर आहे. फलंदाजीत ऑरेंज कॅपसाठी ५४२ धावा फटकावणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा विराट कोहली, तर गोलंदाजीत पर्पल कॅपसाठी १७ बळी टिपणारा मुंबई इंडियन्सचा जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराह आघाडीवर आहेत.

//<><><><><>//